**महावितरण**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
**(महाराष्ट्र शासन अंगीकृत)**
**CIN : U40109MH2005SGC153645**
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.९/ **०६९८०**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahdiscom.in

**दिनांक : ०२.०४.२०१८**

# परिपत्रक

**विषय :** विविध प्रकारचे अर्ज व देयके Employee Portal - Mitra मधून सादर करण्याबाबत.

----

कंपनीत कार्यरत कर्मचाऱ्यांना त्यांची वैयक्तीक माहिती सहजतेने उपलब्ध होणे, त्यातील आवश्यक ते बदल सुचविणे, वैयक्तिक सेवा जसे की रजा, भविष्यनिर्वाह निधी, विविध देयके, बदलीचा अर्ज, शिस्तभंग कारवाई व गोपनीय अहवाल इत्यादी बाबतची माहिती व कार्यालयीन कार्यपध्दतीत सुलभता व सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीकोनातून मानव संसाधन व्यवस्थापन प्रणालीशी संलग्नित Employee Portal -Mitra ही स्वतंत्र प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. तसेच कर्मचाऱ्यांना त्यांचे विविध प्रकारचे अर्ज आणि देयके, सक्षम अधिकाऱ्यांकडे सादर करण्याबाबतची सुविधाही या प्रणालीमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

२. या परिपत्रकाव्दारे कंपनीतील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, दि. ०२.०४.२०१८ पासून त्यांनी त्यांचे सर्व प्रकारचे अर्ज आणि देयके, केवळ Employee Portal - Mitra / Mobile App या प्रणालीमधूनच सादर करावीत. Employee Portal - Mitra / Mobile App या प्रणालीचा वापर न करता अन्य स्वरूपात सादर केलेल्या अर्ज/ देयकांबाबत पुढील कार्यवाही करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

तसेच अधिकारी व कर्मचारी यांना अर्ज / देयके सादर करतांना काही अडचण उद्भवल्यास त्यांनी संबंधीत कार्यालयातील मानव संसाधन विभागाच्या कर्मचाऱ्याशी संपर्क साधावा.

३. सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**( चंद्रशेखर येरमे )**
**कार्यकारी संचालक (मासं)**